# भुयारी मेट्रो जमिनीवर...





कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम वेगाने सुरु असतानाच आता आंध्र प्रदेश येथील श्रीसिटीहून आठ डब्यांची दुसरी मेट्रो मुंबईत दाखल झाली आहे. नव्याने दाखल झालेल्या दुसऱ्या मेट्रोचे डबे मरोळ येथील सारीपूत नगरमध्ये तात्पुरते ठेवण्यात आले आहेत. आठ डब्यांची मेट्रो बॅटरी-चलित शन्टरने जोडता येते. ही जोडणी ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रॅकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या व्यवस्थेत करण्यात येते.